# मू. जे. महाविद्यालय, जळगाव

प्रति,

दि. ०७/१०/२०१७

मा. संपादक,

सर्व वर्तमान पत्रे, जळगाव.

विषय: आपल्या लोकप्रिय दैनिकात सदर बातमी प्रसिद्ध करणेबाबत...

आपला

लेफ्ट प्रा.योगेश बोरसे,

९१५८९८९७५०

## मू.जे.महाविद्यालयात वायु सेना दिवस साजरा

जळगाव: **दि. ०७/ १०/ २०१७**

मूळजी जेठा महाविद्यालयातील संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग आणि एन.सी. सी.चे महाविद्यालय युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने **८५ वा भारतीय वायू सेना दिवस साजरा करण्यात आला.** या वेळी १८ महाराष्ट्र बटालीअन चे कमांडिंग ऑफीसर कर्नल दिलीप पांडे, कर्नल अलेक्स जोसेफ मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात एन.सी.सी. च्या दोन कॅडेट्सनी दिल्ली येथील राष्ट्रीय थल सेना शिबिरात यश मिळवून मू. जे. महाविद्यालयाच्या यशस्वितेची परंपरा कायम ठेवली. दरम्यान त्यांचा विशेष सत्कार देखील कर्नल पांडे यांच्याकडून करण्यात आला. तसेच संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी भारतीय वायू सेनेची आजची आव्हाने या विषयावर प्रेझेंटेशन आणि लघुपट सादर केले.

प्रसंगी कार्यक्रमाच्या **प्रमुख अतिथी श्री दिलीप पांडे** यांनी आपल्या मनोगतात भारतीय वायू सेनेच्या ओपरेशन कैकटस, ऑपरेशन विजय यांच्या सामरिक नीतीमधल्या यशाबद्दल सांगून भारतीय वायुसेनेत भरती होण्याचे आव्हान केले. तसेच

थल सेना शिबिरात महाराष्ट्रातून २५००० एस डी कॅडेट्स म्हणून ४० कॅडेट्स कसे निवडले जातात आणि यात टिकून राहण्यासाठी कॅडेट्स ची वैचारिक आणि शारीरिक मजबुतीचे प्रतिक ध्यानात घेतली जाते. या चाचणीत मू. जे. चे सिनिअर अंडर ऑफिसर मुकेश सूर्यवंशी आणि ज्युनिअर अंडर ऑफिसर दर्शन राठोड यांनी घेतलेल्या मेहनीतीचे साफल्य झाल्याचे श्री पांडे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे **अध्यक्ष प्राचार्य डॉ. यु. डी. कुलकर्णी** यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना अभ्यासात सातत्य ठेऊन लष्करात संयमी अधिकारी म्हणून आपला ठसा उमटवावा अशी इच्छा व्यक्त केली. यशस्वी कॅडेट्स न भावी आयुष्याच्या आणि एन सी सी अधिकार्यांना मोलाच्या मार्गदर्शनाबद्दल शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाची प्रस्तावना लेफ्ट. प्रा. योगेश बोरसे यांनी केली तर लेफ्ट डॉ. एन. डी. राठोड यांनी आभार मानलेत. तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. एस. एन. तायडे, लेफ्ट डॉ. बी. एन. केसुर आणि अनेक विद्यार्थी उपस्थित होते. ** सोबत फोटो जोडले आहेत.




DILIP PANDEY


Celebration

